महाराष्ट्र शासन -

क्रमांक : एसएसएन/१०८३/६७९७-माशि-१
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १८ जून १९८३

प्रति

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/
कोल्हापूर/अमरावती/नागपूर

विषय : १९८३-८४ या शैक्षणिक वर्षात [जून १९८३ पासून]
नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत
[इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून सोबत जोडलेल्या "विवरणपत्रात" नमूद केलेल्या संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून विना अनुदान तत्त्वावर विशेष बाब म्हणून जून १९८३ पासून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत येत आहे. सदर संस्थांनी अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच, नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत येत आहे :

अ] या नवीन माध्यमिक शाळांना कोणत्याही प्रकारचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

क] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

२. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थाबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेवून मगच या संस्थांना नवीन शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

१] संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदलेली आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[कृ. मा. पहा]

३] सदर संस्थेने अंशतः चालविलेल्या माध्यमिक शाळांपैकी एखाद्या
शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

३. तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी.

सही/-
[ वृं. श्री. कुलकर्णी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि इ.

केव्हीके/२०४

शासन पत्र क्रमांक : एसएसएन/१०८३/६७९७-एन
दिनांक : १८ जून १९८३ चे सहपत्र.

१९८३-८४ या शैक्षणिक वर्षात (जून १९८३ पासून) विना अनुदान तत्वावर परवानगी दयावयाच्या नवीन माध्यमिक शाळांची यादी.

(इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त )

| अ.क्र. | संस्थेचे/शाळेचे नाव | शाळेचे ठिकाण | इय-ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |

जिल्हा पुणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | महाराजाधिराज अग्रसेन भवन ट्रस्ट पुणे. | रविवार पेठ, पुणे | आठवी | हिंदी |